॥ वादळ वारं सुटलो गं ॥

गायिकाः लता मंगेशकर
गीतः शांता शेळके
संगीतः पं. हृदयनाथ मंगेशकर

वादळ वारं सुटलो गं
वाऱ्यालो तुफान उठलो गं
भिर भिर वाऱ्यात
पावसाच्या माऱ्यात
सजणानं होडीला पाण्यात लोटलय् ॥ धृ. ॥

गड गड ढगात बिजली करी
फड फड शिडात, धड धड उरि
एकली मी आज घरी बाय्
संगतीला माझ्या कोणी नाय्
चल चल पाडात, खोपीच्या कुडात
जागणाऱ्या डोल्यात सपान मिटलय् ॥ १ ॥

सर सर चालली होडी किनार
दूरवर उठली फेसाची माळ
कमरेत जरा वाकुनिया
पान्यामंदी जालं टाकुनिया
नाखवा माझा दर्याचा राजा
लाखाचं धन त्यानं जाल्यात लुटलय् ॥ २ ॥

शिडाः पाण्याचा फवारा
पाडाः लहान खेडें
खोपीः पक्ष्याचे घरटे
कुडीः झोपडी/ अंग, शरीर